दैनिक महाराष्ट्र **सूर्योदय** www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष २२ || अंक २२१ || गुरूवार २५ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# सोलापुरात प्रहार संघटना आक्रमक... डॉक्टर राखी माने यांना निलंबित करा,मराठा मुस्लिम समाजाला आरक्षण द्या या मागणीसाठी रस्त्यावर उतरून हलगीनाद आंदोलन..

सोलापूर : ( सैफन शेख ) सोलापूरातील विविध मागण्यांसाठी आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने चक्क रस्त्यावर उतरून आगळा वेगळा असा हलगी नाद आक्रोश मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले होते.ङ्कङ्कया आंदोलनात मुद्दा क्र. १) सोलापूर महानगरपालिका आरोग्याधिकारी पदी डॉ.राखी माने यांची जी प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे ती चुकीची व बेकायदेशीर आहे. सदरची प्रतिनियुक्ती मुख्यमंत्र्यांचे उपसचिव अनिरूध्द जेवळगीकर यांनी केलेली आहे. तरी या संदर्भात सर्व नियमांना धाब्यावर बसवून डॉ. राखी माने यांना प्रतिनियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यासाठी उपसचिवांनी केलेल्या कारनाम्यांची चौकशी होणे सुद्धा गरजेचे आहे. डॉ.राखी माने यांची प्रतिनियुक्ती केल्याने सोलापूरकरांचे आरोग्य धोक्यात येणार असून आरोग्याधिकारी पदासाठी '' '' व '''' ही पदवी घेणे आवश्यक आहे. परंतु डॉ.राखी माने या ''- आहेत असे असतांना सुध्दा आरोग्याधिकारी पदाचा पदभार घेतलेला आहे. ही पदवी सदर पदासाठी आवश्यक असतांना डॉ.राखी माने यांची पदवी - असल्याने ते या पदासाठी पात्र नाही म्हणून या पदावर त्यांची नियुक्ती नियमाप्रमाणे करता येत नाही. डॉ.राखी सुहास माने (-) यांची प्रतिनियुक्ती केल्याने सोलापूर शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. तसेच सदर पदासाठी किमान ७ वर्षाचा अनुभव असतो तसेच बायोमेडिकल वेस्ट प्रकरणात सदर एस.एस.सव्हिरोस कंपनीकडे प्रदुषण खात्याची परवानगी सुध्दा नसतांना डॉ.राखी माने यांनी सदर कंपनीवर कोणतीही कारवाई केली नाही. तरी डॉ.राखी माने यांना बेकायदेशीरपणे आरोग्याधिकारीपदाचा पदभार देण्यात ज्या-ज्या अधिकाऱ्यांनी भूमिका बजावली त्या सर्वांची चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे. तसेच




वायोमेटिकल वेस्टेज चे गोलापूर काम पाहणारी एस.एस. सर्व्हिसेस या कंपनीवरही तात्काळ कारवाई करावी वर्डा. राखी माने यांची बेकायदेशीर नियुक्ती रद्द करून त्यांना निलंबित करावे व उपसचिव अनिरुध्द जेयाळगीकर यांची खातेनिहाय चौकशी करावी.ङ्कङ्कलक्ष्मी विष्णू मिल कामगारांना मिलच्या जागेत घरे देणेबाबत - मुद्दा क्र.२) सोलापूर शहरातील जवळपास ३२०० कामगार हे लक्ष्मी विष्णू मिल येथे कार्यरत होत कालांतराने लक्ष्मी-विष्णू मिल बंद पडली आणि कामगारांच्या हातचे काम गेले. पण मिल बंद करतांना नियमांना धाब्यावर बसवून मिल बंद करण्यात आली आणि त्याची करोडो रुपयांची जागा कवडीमोल भावात विकण्यात आली आहे पण कामगारांना त्यांची देणे,व इतर न देता कामगारांवर अन्याय केलेला आहे. तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने लक्ष्मी विष्णू मिल कामगारांना घरे बांधून देण्याकरिता ठराव क्रमांक २८२ दि.१०/१२/२०१८ नुसार करावा करण्यात आलेला आहे. परंतु आजतागायत सदर ठरावावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. लक्ष्मी विष्णू मिल कामगार आजही आपल्या हक्काच्या घरापासून वंचित आहेत. गेल्या २८ वर्षापासून सक्षमी विष्णू मिल कामगार आपल्या हक्कासाठी लढत आहेत. राज्य शासन, जिल्हाधिकारी,व महापालिकेशी कामगारांनी वारंवार पत्रव्यवहार करून अनेक निवेदने दिली, आंदोलने केली,परंतु याकडे आलेले आहे. तरी माननीयांना कळकळीची विनंती की,सदर लक्ष्मी विष्णू मिल कामगारांच्या घरांचा प्रश्न सोडवून त्यांना तातडीने घरे बांधून देण्यात यावीत. प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यातङ्कङ्कमुद्दा मराठा व मुस्लिम समाजाला शिक्षण व नोकरीत आरक्षण देणेबाबत क्र.३) - सध्या राज्यात मराठा आरक्षणाच्या प्रश्न पेटलेला असून त्यात मुस्लिम आरक्षणाची मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही प्रहारची मागणी असून मुस्लिम समाजालाही जे ५ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे त्याची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी,मराठा व मुस्लिम समाजाला आरक्षण देऊन सदर दोन्ही प्रश्न लवकरात लवकर निकाली काढावेत. तरी माननीयांना विनंती आहे की, वरील तिन्ही प्रश्नांचा आपण गांभीर्यपूर्वक विचार करून सदरचे प्रश्न लवकरात लवकर सोडवावेत, असे आशियाचे निवेदन जिल्हाधिकारी डॉक्टर कुमार आशीर्वाद यांना देण्यात आले.ङ्कङ्कया आंदोलनात जिल्हाप्रमुख दत्ता मस्के पाटील,जिल्हा संपर्कप्रमुख जमीर भाई शेख,जिल्हा युवक अध्यक्ष मोहसीन तांबोळी,सोलापूर शहराध्यक्ष अजित कुलकर्णी, सोलापूर कार्याध्यक्ष खालीद मणियार,जिल्हा उपाध्यक्ष महेश शिंगाडे,माजीद पटेल,उजेब इनामदार,लक्ष्मी विष्णू कामगार मिलचे प्रतिनिधी आदिनाथ शिंदे , सुजाताई कांबळे,उस्मान नदाफ, सिद्धाराम काळे,मुदस्सर हुंडेकरी यांच्यासह प्रहार संघटनेचे जेष्ठ व महिला आणि दिव्यांग कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीचे २७ जुलै रोजी आयोजन

सोलापूर : ( सैफन शेख ) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे सन २०२४ या वर्षातील दुसरी राष्ट्रीय लोक अदालत दि.२७ जुलै २०२४ रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेली आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवून लोक अदालतीचा लाभ घ्यावा,असे



आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे अध्यक्ष मो.सलमान आझमी यांनी केले आहे.

यावेळी लोक अदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे,कलम १३८ एन.आय.ॲक्टची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे,भुसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बँक,सहकारी बँक,सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त,बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहणेकरिता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.

लोकन्यायालयात ई-चलनाच्या प्रकरणात एस.एम.एस. द्वारा वाहनधारकांच्या मोबाईलवर नोटीसा पाठविले जात आहेत. सदर चलनानुसार नोटीसमध्ये नमूद लिंकवर ऑनलाइनव्दारे चलनाची रक्कम भरता येवू शकते. तसेच महा ट्राफिक या ॲपवरसुद्धा सदर रक्कम भरता येवू शकते. या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील कोणत्याही जवळच्या वाहतूक शाखेमध्ये जावून सदर रक्कम भरता येवू शकते. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे. धनादेशाची रक्कम एकरकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देवून उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकुमनामा करणे व संपुर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. परिणामी पक्षकारास न्यायालयात पुन्हा हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

लोकन्यायालयाचे फायदे प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा उलट तपासणी,दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्ट बाजीतून कायमची सुटका होते. लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समझोतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार. लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील व्देष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही. न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणा-या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. वेळ आणि पैसा दोघांचाही बचत होते. लोकन्यायालयात निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

# लहान मुलांमध्ये फ्लूची साथ! जाणून घ्या काय काळजी घ्यावी

सोलापूर : पावसाळा सुरू झाल्यापासून साथरोगांचा प्रसार वाढला आहे. सध्या लहान मुलांमध्ये फ्लूची साथ सुरू झाली आहे. ताप, सर्दी, उलट्या आणि जुलाब अशी लक्षणे दिसून येत आहेत. याचबरोबर लहान मुलांना डेंग्यूचा धोकाही वाढला आहे. या पार्श्वभूमीवर लहान मुलांची काळजी घेण्याचा सल्ला बालरोगतज्ज्ञांनी दिला आहे.



लहान मुलांमध्ये फ्लूची साथ दिसून येत आहे. अचानक ताप, सर्दी, उलट्या आणि जुलाब अशी लक्षणे दिसून येत आहेत. पावसाळ्यात लहान मुलांना फ्लूचा संसर्ग होतो. याचबरोबर लहान मुलांना डेंग्यूचा धोकाही वाढला आहे. लहान मुलांमध्ये ताप आणि अंगावर पुरळ अशी लक्षणे दिसून आल्यास पालकांनी तातडीने त्यांना नजीकच्या डॉक्टरांकडे न्यावे. डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य औषधोपचार करावेत. सध्या साथरोगांचा प्रसार वेगाने सुरू असल्याने मूल आजारी पडल्यास त्याला शाळेत पाठवू नये. कारण त्याचा इतर मुलांना संसर्ग होऊ शकतो, अशी माहिती बालरोगतज्ज्ञ डॉ. दिलीप सारडा यांनी दिली.

प्रौढ व्यक्तींमध्ये डेंग्यूची लक्षणे सौम्य असतात. अनेकदा प्रौढ व्यक्तींमध्ये कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. इतर कोणत्याही वयोगटातील व्यक्तींपेक्षा नवजात बालकांसाठी डेंग्यू सर्वात जास्त धोकादायक ठरतो. एक वर्षापेक्षा कमी वयाच्या बाळांमध्ये डेंग्यूमुळे डेंग्यू शॉक सिंड्रोम होऊन प्रकृतीची गंभीर गुंतागुंत होण्याची खूप जास्त शक्यता असते. यामध्ये खूप जास्त रक्तस्त्राव आणि अवयवांचे नुकसान होऊ शकते. त्याला तातडीने वैद्यकीय उपचार व देखभालीची गरज असते, असे सूर्या हॉस्पिटलमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. जयंत खंदारे यांनी सांगितले.

लहान मुलांना पावसाळ्यात फ्लूचा संसर्ग होतो. त्यामुळे पावसाळ्याच्या आधी १ ते १० वर्षे वयोगटातील मुलांना दरवर्षी इन्फ्लूएन्झाची लस देणे गरजेचे आहे. यातून लहान मुलांमध्ये प्रतिकारशक्ती निर्माण होऊन त्यांना फ्लूचा संसर्ग होणार नाही.

# लाडकी बहीण योजनेचे नियम पुन्हा बदलले

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सध्या राज्यभरात चर्चा सुरू आहे. सत्ताधाऱ्यांकडून ही योजना राबविण्यासाठी महिलांना सहजासहजी व सुलभरितीने शक्य व्हावे म्हणून नियमात सातत्याने शिथीलता आणली जात आहे.




अलीकडे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत लाडकी बहीण योजनेत देखील ६ बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे योजनेसाठी अर्ज करणाऱ्या महिलांसाठी मोठा दिलासा मिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पोस्ट बँक खाते ग्राह्य धरले जाणार आहे. एखाद्या महिलेचा परराज्यामध्ये जन्म झाला असेल आणि तिने महाराष्ट्रात अधिवास असलेल्या पुरुषासोबत विवाह केला तर त्याही महिलेला पतीच्या कागदपत्रांवरती योजनेचा लाभ मिळणार आहे. ग्राम समितीच्यामार्फत प्रत्येक शनिवारी लाभार्थी महिलांची यादी वाचन करून दाखवून त्यात बदल करावा लागणार आहे. केंद्र सरकारची योजना घेत असलेल्या महिलेला लाभार्थी म्हणून ग्राह्य धरावे. मात्र, तिच्याकडून ऑफलाईन अर्ज भरून घेण्यात यावा. नव विवाहित महिलेची विवाह नोंदणी लगेच शक्य नसेल तर त्या महिलेच्या विवाह दाखल्यानुसार पतीचे रेशनिंग कार्ड पुरावा म्हणून ग्राह्य धरावे. ओटीपीचा कालावधी १० मिनिटांचा करण्यात यावा.

# राज्यातील दस्त नोंदणी शनिवारी बंद

सोलापूर : नवी मुंबईतील ईएसडीएसकडून ॲडवान्स डाटा सेंटरमध्ये विदा (डाटा) स्थलांतरित करण्यात येणार आहे. हे काम शुक्रवारी रात्रीपासून शनिवारी दिवसभर सुरू राहणार आहे. परिणामी शनिवारी (२७ जुलै) राज्यभरातील दस्त नोंदणी कार्यालये बंद राहणार आहेत.याबाबतचे आदेश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक हिरालाल सोनवणे यांनी प्रसृत केले.

ईएसडीएसकडून विदा स्थलांतर करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. या कामासाठी २४ तासांचा कालावधी लागणार असून या कालावधीत 'आयसरिता' दस्त नोंदणीसह सर्व सेवा उपलब्ध असणार नाहीत. त्यामुळे शुक्रवारी (२६ जुलै) रात्री साडेनऊ वाजल्यापासून शनिवारी (२७ जुलै) रात्री उशीरापर्यंत विदा स्थलांतराचे काम सुरू राहणार आहे. परिणामी शनिवारी राज्यभरातील दस्त नोंदणी कार्यालयांचे कामकाज बंद राहणार आहे.रविवारी (२८ जुलै) राज्यातील जी दस्त नोंदणीची कार्यालये सुरू असतात, त्या कार्यालयांमध्ये दस्त नोंदणीचे कामकाज सुरू राहणार आहे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

संपादकीय

## मनोरंजन नव्हते

'आमचे येथे श्रीकृपेकरून अमुक अमुक यांचे सुपुत्र आणि अमुक अमुक यांची सुकन्या यांचा शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे. तरी मांडवशोभेसाठी आपण अवश्य यावे' अशी कोणे एके काळची आपल्या वाडवडिलांच्या लग्नाची इतकी थेट पत्रिका धनाजीरावांच्या डोळ्यासमोरून हलत नव्हती. शरीरसंबंध मांडवशोभा छ्या हे म्हणजे फारच झाले. लग्न म्हणजे स्वर्गात बांधल्या जाणाऱ्या पवित्र गाठी, त्या पृथ्वीवर येऊन पक्क्या करायच्या असतात. त्याआधी दोन्ही घराणी किती तोलामोलाची आहेत, हे पाहायचे असते. लग्न म्हणजे दागदागिने, कपडेलत्ते, मेजवान्या, भेटवस्तू, नाचगाणी, भेटीगाठी हेच त्यांना माहीत होते. आपल्या आजोबा-पणजोबांच्या जीवनात जरा म्हणून मनोरंजन नव्हते, म्हणून त्यांनी अशा थेट आणि रूक्ष पत्रिका लिहून लग्ने उरकली. आपण आपल्या धाकट्याच्या बाबतीत मात्र तसे अजिबात करायचे नाही, असे धनाजीरावांनी ठरवून टाकले होते. त्याला कारणही तसेच होते. हे कारण काय आणि हे धनाजीराव कोण म्हणून विचारता? अहो तेच ते. कोणे एके काळच्या आटपाट नगरातले. नाही समजले? पहिल्यापासून नीटच सांगायला हवे आहे म्हणता? चला तर मग काय झाले की पूर्वीच्या कहाण्यामध्ये असते तसे एक आटपाट नगर होते. तिथे धनाजीराव आणि सुंदराबाई हे जोडपे राहत होते. आणि हो, या आटपाट नगरात धनाजीरावांच्या गावीही नसलेले एक नानाजीपंतही होते. पण आपणही त्यांची फार दखल घेण्याची गरज नाही. तर असो, गाठीला बक्कळ पैसा जोडलेल्या धनाजीरावांना गावात चांगलाच मान होता. त्यांचे कुटुंबही खाऊनपिऊन सुखी होते. धनाजीरावांच्या दोन गुणी मुलांचे विवाह झाले होते आणि त्यांच्या कुटुंबात एक सुशील सून आणि जावयाची भर पडली होती. आता त्यांच्या शेंडेफळाचे लग्न होऊ घातले होते. धनाजीरावांच्या घरातले हे शेवटचे कार्य. त्यामुळे सगळ्या पंचक्रोशीत त्याची चर्चा झाली पाहिजे, 'आजवर असा विवाह पाहिला नाही,' असे लोकांनी म्हटले पाहिजे असे धनाजीरावांना वाटत होते. शिवाय त्यांच्या असेही लक्षात आले की त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीच्या, त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत आटपाट नगरात महागाई अगदीच किरकोळ होती. त्यामुळे मग धनाजीराव आणि सुंदराबाई यांनी हा समारंभ झोकात, अगदी हात सैल सोडून करायचे ठरवले.

गावोगावी आमंत्रणे पाठवायची होती. धनाजीरावांचा मित्रपरिवार तसा मोठा आणि वेगवेगळ्या थरांमधला. कुणाला चढवायचे नाही आणि कुणाला उतरवायचे नाही म्हणून ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे पत्रिका छापायचे आणि पाठवायचे ठरले. आपल्या घरातून जाणारी लग्नपत्रिका पुढची पन्नास वर्षे लोकांनी जपून ठेवली पाहिजे, असे धनाजीराव आणि सुंदराबाई यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी पत्रिकाही अशा सोन्याचांदीचा वर्ख ल्यालेल्या छापल्या की त्या ज्यांना ज्यांना मिळाल्या त्या बघून सगळ्यांनी आ वासला. ज्यांना पत्रिका गेल्या नाहीत, त्यांना म्हणजे नानाजीपंतांना आपोआपच समजले की आपण किती मोठे व्हायला हवे, तर धनाजीरावांच्या घरून आमंत्रण यायला हवे एवढे. त्यामुळे ज्यांना धनाजीरावांकडून पत्रिका आली असे लोक आणि ज्यांना आली नाही असे लोक अशी आपोआपच जगाची विभागणी झाली. तर असो. लग्न समारंभ एकाच दिवशी झाला तर तो कशाला कुणाच्या लक्षात राहील, असे धनाजीरावांना वाटत होते. लग्न मुहूर्तावर लावायचे असल्यामुळे ते एकदाच लावावे लागते, पण साखरपुड्याचे तसे काही नसते अशी पळवाट गुरुजींनी काढून दिल्यावर सगळे कसे सोपे होऊन गेले. एकदा मुलाच्या घरी, एकदा मुलीच्या घरी, एकदा शेतातल्या बंगल्यावर असा तीन तीन वेळा साखरपुडा झाला. अशीच वेगवेगळ्या ठिकाणी तीन तीन वेळा व्याहीभोजने झाली. त्याशिवाय संगीत समारंभ, मेंदी समारंभ, सीमान्तपूजन आणि मुख्य लग्न समारंभ आणि त्यानंतरचा स्वागत समारंभ अबब या सगळ्या कार्यक्रमांमधल्या वधूवरांच्याच नाही, तर इतरांच्याही पोशाखांची, दागदागिन्यांची, जेवणावळींमधल्या पदार्थांची यादी ऐकूनच नानाजीपंतांची दमछाक होत होती. तीन साखरपुडे, तीन व्याहीभोजने आणि प्रत्यक्ष लग्न समारंभ यांत वेगवेगळे पेहराव करायचे, त्यावर वेगवेगळे दागिने घालायचे म्हणजे वऱ्हाडी मंडळींनीच धनाजीरावांच्या चिरंजीवांच्या विवाहासाठी किती बरे खर्च केला असेल, अशी चर्चा नानाजीपंतांच्या घरीदारी रंगू लागली.

नानाजीपंतांना वाटू लागले, लग्न असावे तर असे

# मुंडे महाविद्यालयात कायदेविषयक शिबीर संपन्न

मंडणगड -(प्रतिनिधी) दि. :येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात तालुका विधी सेवा समिती दापोली-मंडणगड यांच्या वतीने कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून मंडणगड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मिलिंद लोखंडे, सदस्या ॲड. सौ. सोनल बेर्डे, ॲड. धनंजय करमरकर हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहूल जाधव होते. यावेळी मंडणगड न्यायालयातील श्री. प्रथमेश पाटील, वसंत शिंदे, सचिन चिले, प्रा. महादेव वाघ, प्रा. अशोक कंठाळे, प्रा. साई पवार, प्रा. प्राची कदम, ग्रंथपाल डॉ. दगडू जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.



ार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. राहूल जाधव यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर श्री. प्रथमेश पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक करुन कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.

मार्गदर्शक ॲड. सोनल बेर्डे म्हणाल्या की, (लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२) या कायदयामुळे बालकांचे अनेक गुन्हयांपासून संरक्षण केले जाते. आरोपी व फिर्यादी यांना समोरासमोर न आणता पोलीस या खटल्याची चैकशी करतात. या कायद्यांतर्गत आरोपीस कारावासाची शिक्षाही होवू शकते. पोक्सो कायद्यांतर्गत सर्व गुन्हे अजामिनपात्र आहेत, याचा अर्थ आरोपीला जामिन मिळू शकत नाही. पोस्को खटले चालवण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी व जलद आणि संवेदनशील खटल्यांची खात्री करण्यासाठी या कायद्यात तरतूद आहे. यावेळी त्यांनी सदर कायद्याची सविस्तर माहिती दिली.

ॲड. धनंजय करमरकर यांनी 'शिक्षणाचा अधिकार' या विषयावरती मार्गदर्शक केले. मोफत आणि शक्तीचे शिक्षण हा प्रत्येक बालकाचा अधिकार आहे. शिक्षणाच्या प्रवाहात आल्याने आपल्यावर होणा-या अन्यायाची जाणीव होते. अन्याय सहन करणे हा देखिल एक गुन्हा आहे असे त्यांनी सांगितले. ङ्गॲड. मिलिंद लोखंडे यांनी सांगितले की, समाजामध्ये विविध भारतीय कायदेविषयक जनजागृती करणे आज काळाची गरज बनली आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांबरोबरच आज कायदेविषयक माहिती असणे देखील निकडीचे आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या अनेक प्रश्नांनाना ॲड. मिलिंद लोखंडे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

अध्यक्षस्थनावरुन बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहूल जाधव यांनी सांगितले की, कायदा हा माणसाला निर्भयपणाने जीवन जगायला शिकवतो. नेहमीच्या जीवनात असे अनेक प्रसंग येतात की, कायद्यासंबंधी माहिती नसल्यामुळे आपल्यावर अन्याय होतो आणि म्हणून तालुका विधी सेवा समितीच्या माध्यमातून कायदेविषयक प्रबोधन खेड्यापाड्यापर्यंत जावून शेवटच्या घटकापर्यंत करण्याचे काम समितीच्या वतीने केले जाते असे सांगितले.

कार्यक्रमास शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. महादेव वाघ यांनी तर आभार श्री. प्रथमेश पाटील यांनी मानले.

# नैसर्गिक नाल्याचा स्त्रोत अडवल्याने शेतकरी चव्हाण यांच्या शेतीचे नुकसान, महसूल प्रशासन दखल घेणार का?

कर्जत ( जयेश जाधव) कर्जत तालुक्यातील नांगुर्ले अभयवाडी या भागात कोकणातील चव्हाण कुटुंब १९७७ साली वसले. या भागात त्यांनी शेतीसाठी जागा घेतली होती. हा भाग कर्जत व खालापूर असा दोन्ही तालुक्याच्या सीमेवर आहे. त्यामुळे चव्हाण यांची अधिक जागा हि खालापूर तालुक्यात येते. चव्हाण कुटुंबाची आज येथे १० एकर जागा आहे. तर त्यातील ५ एकर जागेमध्ये ते लागवड करतात. दत्ताराम चव्हाण यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी सुलोचना चव्हाण यांनी शेतीची धुरा सांभाळली. खालापूर तालुक्यातील पाली बुद्रुक येथील सर्व्हे नंबर ९४, ९५ व ९९ अशी शेत मिळकत सुलोचना चव्हाण, अल्का चव्हाण-समेळ, किशोर चव्हाण, नरेश चव्हाण, सरिता चव्हाण, सायली गावकर यांच्या नावावर आहे. शेतीशी चव्हाण कुटुंबाची नाळ जोडली गेली असल्याने गेले अनेक वर्षे संकटांवर मात करीत हे कुटुंब शेती सांभाळून आहेत.ङ्गङ्गघरात इंजिनियर, पोलीस निरीक्षक, खाजगी नोकरीत उच्च अधिकारी अशी पद सांभाळणारी हि माणसं आजही शेतीत रमतात. तर ७७ वयाच्या सुलोचना चव्हाण या आजही शेती करतात हे विशेष ! दरम्यान चव्हाण कुटुंबाच्या शेती लगतच वीरेन आहुजा यांचा ओरलँडर (सॉल्ट) रिसॉर्ट आहे. या रिसॉर्टमध्ये आहुजा यांनी सन २०२१-२२ च्या दरम्यान काही बदल करत तलावाची निर्मिती केली. मात्र यासाठी त्यांनी नैसर्गिक पाण्याचे प्रवाह खंडित केले आणि याचा फटका चव्हाण यांना बसला





असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नैसर्गिक पाणी प्रवाह थांबवत तलाव बांधला असुन कालांतराने निचरा होणारे पाणी अडविले. त्याठिकाणी तलाव बंधारा बांधला असून तलावाच्या निचऱ्याचे पाणीही अडविल्याने तलाव काटोकाट भरल्यावर हे पाणी भरल्याने मागे फिरून समेळ चव्हाण यांच्या शेतात जाऊन अडीच एकर शेतीचे नुकसान होत आहे. पावसाळ्यात तलावाचे पाणी व त्यांच्या शेतातील पाणी समेळ चव्हाण यांच्या शेतात जाऊन सुमारे अडीच एकर शेतीचे नुकसान झाले आहे.ङ्गङ्गअलका समेळ-चव्हाण यांनी याबाबत खालापूर तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी २८ डिसेंबर २०२३ रोजी संबंधित यांची संयुक्त बैठक घेऊन शेतकरी यांचे नुकसान भरपाई व केलेले अनधिकृत बांधकाम तोडण्याचे आदेश दिले होते, परंतु त्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने अल्का समेळ चव्हाण यांनी रायगड जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देत उपोषणाचा इशारा दिला होता. तरीही प्रशासन ढिम्म असल्याने अल्का समेळ चव्हाण व त्यांची ७७ वर्षांची आई आई सुलोचना चव्हाण व यांनी ७ जून २०२४ रोजी उपोषणाला सुरुवात केली.ङ्गङ्गअखेरीस या उपोषणाची दखल घेऊन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी येऊन तलावाची भिंत तोडण्याचे आदेश दिल्यावर हे अनधिकृत बांधकाम तोडण्यास सुरुवात झाली. तसेच यावेळी प्रशासनासमोर चव्हाण यांच्या शेतीचे माझ्याकडून नुकसान होणार नाही असा शब्द त्यांनी दिला. मात्र त्यानंतर पुन्हा त्यांनी तोडलेली भिंत पुन्हा बांधल्याने हाच प्रकार समोर आला आहे. प्रशासनाचे आदेश याच तलावात बुडवत आहुजा यांनी पुन्हा बांधकाम केलं त्यामुळे यंदा पुन्हा चव्हाण यांच्या शेतीच नुकसान झालं आहे. १२ महिने शेती करणारे आम्ही शेतकरी यामुळे चिंतीत झालो आहोत. आज शेतीकडे शेतीकारी पाठ फिरवत असताना आम्ही आमची शेती जोपासून आहोत हि आमची चूक का ? शेतकऱ्याने कायम अन्याय सहन करायचा का ? असा जळजळीत सवाल अल्का समेळ चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला आहे.ङ्गङ्गदरम्यान आहुजा यांनी आपल्या रिसॉर्टमध्ये काय करावं हा त्यांचा प्रश्न असला तरी कायद्यानुसार नैसर्गिक नाल्यांची वाट अडवणे आणि ती बदलणे हे चुकीचे आहे. तर खालापूर तहसीलदार यांनी दिलेल्या आदेंशला देखील अहुजा यांनी तिलांजली दिल्याचा प्रकार यानिमित्ताने समोर आला आहे. तेव्हा आता महसूल प्रशासन अशा मुजोर धनदांडग्याला कायदयाचा झटका देणार का ? असा प्रश्न निर्माण झाला असून याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. तर विरेन आहुजा यांच्या रिसॉर्टमध्ये असलेले तलाव यांची त्यांनी उंची वाढवली. तर एक तलाव त्यांनी बुजवला त्यामुळे माथेरानच्या डोंगरातून येणारे नैसर्गिक पाणी याची वाट अडून ते पाणी आमच्या शेतात शिरते. यावर तक्रारी करून उपोषण देखील आम्ही केले होते. त्यानंतर संबंधितांवर महसूल विभागाकडून कारवाई करण्यात आली.ङ्गङ्गमात्र त्यानंतर पुन्हा आहुजा यांच्याकडून तलावाचे तोडलेले बांधकाम करण्यात आले. त्यामुळे यावर्षी पुन्हा आमच्या शेतात पाणी शिरून भात पीक उद्ध्वस्त झाले आहे. आमच्या शेतीचे नुकसान करून ही जमीन बळकावण्याचा त्यांचा प्रयत्न असू शकतो. मात्र आम्ही शेतकरी आहोत, शेती ही आमची आवड असल्याने इतकी वर्ष शेती सांभाळली. धनाड्यांकडून आजवर अनेकदा शेतकऱ्यांना त्रास देण्यात आला आहे. यावर शासनाने कारवाई करत शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी आमची मागणी आहे. अन्यथा शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी शेतकऱ्यांची धारणा होईल. असी पिडित शेतकरी अलका समेळ- चव्हाण यांनी पत्रकाराना प्रतिक्रिया दिली.

# केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी.

द. रा. जि. प्रतिनिधी:
संतोष उध्दरकर.

म्हसळा: २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यांतील चिखली गावात जन्मलेले निर्भिड पत्रकार, शिक्षक,समाज सुधारक आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील लोकप्रिय नेते लोकमान्य बालगंगाधर टिळक यांची १६८ वी जयंती म्हसळा तालुक्यात केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करून साजरी करण्यात आली. यावेळी प्रभारी कृषि अधिकारी जे.बी.धानिवले यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांचे प्रतीमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या वेळी माजी सभापती महादेव पाटील,अध्यक्ष संजय खांबेटे,खजिनदार सुनील उमरोटकर,संचालक पांडुरंग पाटील,माजी सभापती महादेव पाटील,कृषी पर्यवेक्षक एस.एन. कुसाळकर,कृषी सहाय्यक धनंजय सरनाईक,राहूल झडे,अशोक सानप,नरेश जामकर, परेश नाक्ती,सचिन चव्हाण,ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगले,प्राची



मेंदडकर आदी मान्यवर उपस्थित होते.जयंती निमित्ताने वाचनालयात टिळक पर्व,अष्टावधानी लोकमान्य, महापुरुषांची महायात्रा, केसरीकारांच्या पाच पिढया, महापर्व,लोकमान्य ते महात्मा,निवडक चरित्रे,ओळख थोर नेत्यांची,थोरांचे अज्ञात पैलू,समाज सुधारक आणि विचारवंत, लोकमान्य टिळक यांनी घडविला महाराष्ट्र, जागतिक कीर्ती ची ५१ नररत्ने आसे विविध ग्रंथ प्रदर्शनात ठेवले होते. या वेळी ग्रंथालयाचे खजिनदार सुनिल उमरोटकर आणि मान्यवरांनी बाल गंगाधर टिळक यांची स्वातंत्र्य सैनिक आणि वकील अशी ओळख असलेले टिळक यांना ''रविंद्रनाथ टागोर''

यांनी लोकमान्य पदवी दिली.लोकमान्य अर्थात जनतेचा लाडका नेता. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी टिळकांनी सिंहगर्जना केली होती आदी माहिती विशद केली.

# कोरोना महामारीत मातृ-पितृ हरपलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर संपन्न : दि प्राइड इंडिया व महानगर गॅस लिमिटेडतर्फे उपक्रम

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून दि प्राइड इंडिया महाड येथील मुख्य कार्यालयात सक्षम प्रकल्प अंतर्गत प्राईड इंडियाच्या वतीने व महानगर गॅस लिमिटेड च्या सहकार्याने कोरोना महामारीमध्ये मातृ-पितृ हरपलेल्या सुधागड व महाड तालुक्यातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला.



या कार्यक्रमात दि प्राइड इंडिया रायगड जिल्ह्याचे वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक वसंत मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, २०२१-२२ ते २०२३-२४ या तीन वर्षात कोरोना महामारीत मातृ-पितृ हरपलेल्या ३६ विद्यार्थी यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करीत आहोत. तसेच दरमहा कुटुंबाला आवश्यक असलेला किराणा सामान, विद्यार्थ्यांची शाळा - महाविद्यालयाची वार्षिक फी, रु. १५०० पर्यंत वार्षिक शैक्षणिक साहित्य, शाळेतील विद्यार्थ्यांना युनिफॉर्म खर्च, स्कूल बॅग, रु. १००० पर्यंत प्रवास गाडीभाडे, खाजगी क्लासेस, टायपिंग क्लासेस तसेच इतर कोशल्य विकासासाठी लागणारे कोर्सेस यांची संपूर्ण फी, कौटुंबिक औषध उपचारासाठी लागणारे सर्व प्रकारची औषधे, तसेच विद्यार्थ्यांचा पाच लाखाचा विमा, इत्यादी मदत दि प्राईड इंडिया यांच्यावतीने व महानगर गॅस यांच्या सहकार्याने करीत आहोत.ङ्क या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक पालीतील शेठ ज. नौ.पालीवाला महाविद्यालयाचे वाणिज्य, विभागाचे प्राध्यापक संतोष भोईर यांनी स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करताना उपस्थित विद्यार्थी व पालक यांना संबोधन करताना सांगितले की, स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि मिळालेल्या संधीचं सोनं केलं तर यश आपोआप मिळते. तसेच फक्त स्पर्धा परीक्षा हे जगातला सर्वात उत्तम करिअरचे साधन आहे असं मानू नये. चांगलं काम करण्याचं एक साध्य म्हणून त्याकडे बघा. अपयशाने घाबरून जाऊ नका. पर्यायी क्षेत्रात गेलात तरी त्यात प्राविण्य मिळवा.

त्यासाठी प्लॅन बी तयार ठेवा. स्पर्धा परीक्षेचा मनापासून अभ्यास करणाऱ्यांना हा अभ्यास जो दृष्टिकोन देतो, तो आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात कामी येऊ शकतो. म्हणून परीक्षा देताना आपल्यात आत्मविश्वास असावा, स्पर्धा परीक्षेत करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांना समाजात मिसळण्याची आवड हवी, समाजमन समजून घेण्यासाठी त्याचे कान- डोळे सतत जागे हवेत, सोशल कॉन्टॅक्ट जास्तीत जास्त वाढवता आले पाहिजे, जे कराल ते चुकून देऊन करा स्पर्धा परीक्षा ची प्रक्रिया आयुष्य घडवायला खूप मदत करते, अभ्यासातून ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. शेवटी मार्गदर्शन करताना प्रा. भोईर सर यांनी स्पर्धा परीक्षा हा एक मोठा अनिश्चित असा खेळ आहे. या खेळात जिंकलो किंवा हरलो तरीही आयुष्याच्या निकालात स्पर्धा परीक्षेचा हा खेळ खूप काही शिकवून जातो, असे सांगितले

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे रायगड जिल्हा परिषद अलिबाग रायगडचे स्वच्छता पाणी कक्ष व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना संबोधन करताना सांगितले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी अपार कष्ट आणि प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.. या कार्यक्रमासाठी पाली - सुधागड व महाड तालुक्यातील कोरोना महामारीत ज्यांचे मातृ-पितृ हरपलेली आहेत असे विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दि प्राइड इंडिया पाली-सुधागडचे प्रकल्प समन्वयक योगेश भोईर व आभार महाड तालुक्याचे प्रकल्प समन्वय रुपेश धामणस्कर यांनी केले.

# रत्नागिरी डाकघर येथे गुरुवारी वित्तीय समायोजन मेळावा

रत्नागिरी, दि. २४ (जिमाका) : डाक विभाग, रत्नागिरीवतीने २५ जुलै रोजी रत्नागिरी हेड पोस्ट ऑफीस, गाडीतळ येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ वा. या वेळेत वित्तीय समायोजन मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाक विभागामार्फत करण्यात येत आहे.

ग्रामीण डाक विमा, डाक विमा, इंडिया पोस्ट पेमेंट बँकाच्या सर्व सुविधा, जन सुरक्षा योजना,

प्रधानमंत्री किसान योजना खाती, माझी लाडकी बहीण योजना खाती, महिला सन्मान योजना खाती, पोस्ट ऑफीसच्या विविध योजनांची खाती, लहान मुलांचे आधारकार्ड काढणे, अपडेट करणे, आधार केंम्पमध्ये आधार वरील नाव बदलणे, पत्ता बदलणे, फोटो बदलणे, मोबाईल नंबर लिंक करणे आदी योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी घेता येणार आहे.

## तळा तालुका क्षय मुक्त करण्यासाठी सारयानींच प्रयत्न करु या - तहसीलदार स्वाती पाटील.

तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये सगळया गावातून सारयानींच क्षय मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन तळा तहसीलदार तथा कुष्ठरोग समिती अध्यक्षा स्वाती पाटील यांनी केले आहे

तळा तहसिल कार्यालयात आयोजित टि. बी. फोरम बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी वंदनकुमार पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. होलसांगले, डॉ. स्नेहल हेलपळे, महीला बालकल्याण अधिकारी दिपाली पाकेरे,मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, पंचायत समिती आरोग्य विस्तार अधिकारी डी. डी. झोरे, त्याचबरोबर आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, राष्ट्रीय कुष्ठरोग आरोग्य दुरीकरण कर्मचारी, आशा सेविका, उपस्थित होते.



# मुसळधार पावसामुळे टिटवाळा जवळील रूंदे पूल पाण्याखाली; १२ गावांचा संपर्क तुटला

कल्याण मुसळधार पावसामुळे टिटवाळ्या जवळील काळू नदीवरील रूंदे पूल बुधवारी दुपारी पाण्याखाली गेला. त्यामुळे या पुलावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. या पुलावरील वाहतूक बंद झाल्याने परिसरातील १२ गावांचा कल्याण परिसराशी असलेला संपर्क तुटला आहे.टिटवाळा जवळील रूंदे गाव हद्दीतून काळू नदी वाहते. या नदीवरील पूल नदीच्या पाणलोट स्तरापासून कमी उंचीचा आहे. त्यामुळे पावसाळ्यात काळू नदी दुथडी भरून वाहू लागली की रूंदे पूल पाण्याखाली जातो. मागील दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने काळू नदीला पूर आला आहे. या पुरामुळे रूंदे पूल पाण्याखाली गेला आहे.



कल्याण, टिटवाळा भागात जाण्यासाठी फळेगाव, उशीद, हाल, मढ, पळसोली, काकडपाडा, दानबाव, नडगाव, वावेघर, राया, उतणे, ओझर्ली, चिंचवली, कुंभारपाडा गावांमधील रहिवासी रुंदे पुलाचा वापर करतात.सकाळी या गावांमधून दूध विक्रेते, भाजीपाला विक्रेते कल्याण, मुंबई परिसरात गेले होते. हे व्यावसायिक घरी परतताना रूंदे पुलावर पाणी असल्याने अडकून पडले. टिटवाळा, कल्याण भागात शाळांमध्ये येणारे विद्यार्थ्यांना या पुराचा फटका बसला.

न्यायालय आवार पाण्यात

कल्याण पश्चिमेतील रेल्वे स्थानक भागात स्मार्ट सिटी प्रकल्पाची कामे सुरू आहेत. या भागात या कामांमुळे काही ठिकाणी गटारे बांधण्यात आलेली नाहीत. काही ठिकाणी नाल्यांमध्ये पाणी वाहून जाण्यासाठीच्या मार्गात अडथळे आहेत. त्यामुळे मुसळधार पाऊस सुरू झाल्यापासून कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक परिसर, कल्याण जिल्हा न्यायालय, तहसीलदार कार्यालय, दिलीप कपोते वाहनतळ भागात पाणी साचत आहे.

न्यायालयात आवारात पाणी तुंबत असल्याने वकिलांसह अशिलांना या पाण्यातून येजा करावी लागते. तहसीलदार कार्यालयात जाणाऱ्या नागरिकांचीही तीच अवस्था आहे. आता रस्ता वरील भागात आणि न्यायालयाची इमारत खालच्या भागात गेल्याने न्यायालय आवारात पाणी तुंबण्याचे प्रमाण अधिक आहे.या भागातील पाणी उपसा करण्यासाठी पालिकेने तीन उच्च दाबाचे पंप बसविले आहेत.

# मुक्तता

इतरांनी कसे वागावे यावर उच्चपदस्थांनी प्रवचने झोडण्यास अल्पकर्तृत्व पुरते. त्याचे दिवसागणिक अनेक नमुने आसपास पाहावयास मिळतील. आव्हान असते स्वत:च्या क्षेत्रातील कर्तव्यच्युतीची दखल घेण्याचे आणि उच्चपदस्थांस प्रिय; पण अयोग्य कृती दाखवून देण्याचे. हे आव्हान सर्वोच्च न्यायालय अलीकडे पेलताना दिसते ही मोठी दिलासा देणारी बाब. गेल्या आठवड्याच्या अखेरीस सर्वोच्च न्यायालयाच्या दोन स्वतंत्र पीठांच्या कृतीतून हा दिलासा मिळतो. व्यवस्थेविषयी बरे काही बोलावे, सांगावे असे अनुभव अधिकाधिक दुर्मीळ होत असताना सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतींची दखल घेणे आणि तिचा प्रसार करणे आवश्यक ठरते.

यातील पहिली घटना आहे ती न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भुयान यांनी पटणा उच्च न्यायालयास खडसावले त्याची. या न्यायालयाने एका खून प्रकरणातील आरोपीस जामीन तर दिला; पण त्याच्या जामिनावरील मुक्तता सहा महिन्यांनी होईल अशी अट घातली. खरे तर यातील विरोधाभास लक्षात येण्यास न्यायपंडित असण्याचीही गरज नाही. तरीही आपल्या निर्णयातील खोट या न्यायाधीश महोदयांस लक्षात आली नाही. परिणामी सर्वोच्च न्यायालयाकडून बोलणी खाऊन घेण्याची वेळ उच्च न्यायाधीशांनी स्वत:वर आणली. ''हा काय प्रकार आहे? काही न्यायाधीशांकडून सहा महिने वा वर्षभर जामीन नाकारण्याचे प्रकार घडत असताना त्यात आता हा नवा नमुना'' असे म्हणत न्या. ओक यांनी या ''आभासी जामीन'' प्रकाराबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. 'आरोपी जामिनास पात्र आहे; पण तो त्यास सहा महिन्यांनी मिळेल' हे असे सांगणे कोणत्या कायद्यात बसते असा न्या. ओक यांच्या म्हणण्याचा अर्थ. पाटणा उच्च न्यायालयाच्या या आदेशाची संभावना न्या. ओक 'अगदी विचित्र' (एक्स्ट्रीमली स्ट्रेंज) या विशेषणाने करतात. सर्वोच्च न्यायालयालाच आपल्या नियंत्रणाखालील उच्च न्यायालयाचे वर्तन 'अगदी विचित्र' वाटत असेल तर सामान्यांच्या न्यायाधीशांबाबतच्या भावना काय असतील हे समजून घेणे अवघड नाही. अलीकडे काही उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांवर कडकडीत आसूड ओढण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर वारंवार येताना दिसते. गुजरात, पाटणा ही यातील काही उदाहरणे. आपणच ज्याचे नियंत्रण करतो त्या काही उच्च न्यायालयातील काही न्यायाधीशांची बौद्धिक कमअस्सलता सर्वोच्च न्यायालयास खरोखरच टोचू लागली असेल तर त्यातून परिस्थितीत काही सुधारणा होण्याची शक्यता निर्माण तरी होते.

एरवी आपले कसे उत्तम सुरू आहे याची टिमकी स्वत:च वाजवणाऱ्यांची कमतरता आपल्याकडे नाही.सर्वोच्च न्यायालयाची दुसरी कौतुकास पात्र कृती ही अलीकडे सत्ताधीशांस प्राणप्रिय अशा 'ईडी' या यंत्रणेविषयी आहे. ही यंत्रणा म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या राजकीय लढाईतील जणू ब्रह्मास्त्रच. पूर्वी ही जबाबदारी 'सीबीआय' या यंत्रणेवर असे. पण या यंत्रणेस रोखण्याचा अधिकार राज्यांस आहे हे लक्षात आल्यावर 'ईडी'त प्राण फुंकले गेले. तोवर विरोधी बाकांवर असताना 'सीबीआय'च्या दुरुपयोगाविरोधात कंठशोष करणारे सत्तेवर आले की 'आधीचे बरे' असे म्हणण्याची वेळ कशी आणतात, हे दिसून आले होते. अलीकडे सीबीआयच्या जोडीने आपल्यासमोर नतमस्तक होण्यास विरोध करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्याच्या कामी 'ईडी'ही जुंपली जाते असा आरोप विरोधक वरचेवर करतात. त्यात तथ्य नाही हे मानणे अवघड. या आरोपांची दखल घेण्याची सजगता सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा दाखवली आणि 'ईडी'चे वस्त्रहरण केले. कानात वारे गेल्यासारखे वागणाऱ्या या यंत्रणेस वेसण घालण्याची गरज होतीच. सर्वोच्च न्यायालयाचे ताजे भाष्य काही प्रमाणात का असेना ती पूर्ण करते.

मुद्दा होता दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामिनाचा. त्यांना जामीन देण्यास अर्थातच 'ईडी'चा विरोध आहे आणि त्यांच्यावर झालेली कारवाई ही पूर्णपणे नियमाधारित आणि न्याय्य आहे असे या यंत्रणेचे म्हणणे आहे. या आरोपांची सत्यासत्यता तपासण्याआधी न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपंकर दत्ता यांच्या पीठाने केजरीवाल यांस जामीन द्यावा की न द्यावा यावर सविस्तर भाष्य केले, ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. 'संशय' आणि 'खात्री' यावर न्या. खन्ना 'ईडी'स धारेवर धरतात आणि 'न्याय्य कारवाई' आणि 'अधिकाऱ्यांची मनमानी' यातील भेदही स्पष्ट करतात. कोणत्याही कारवाईची सुरुवात संशयावरून होत असली तरी केवळ संशय हा कारवाईसाठी पुरेसा ठरत नाही. भ्रष्टाचाराच्या संशयासाठी एखाद्यास अटक करण्याची गरज 'ईडी'स वाटत असली तरी या अटकेच्या गरजेची न्यायिक पूर्तता होऊ शकेल असा पुरावा या यंत्रणेच्या हाती आहे का, हा न्या. खन्ना यांचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो आणि त्याच्या उत्तरातून बऱ्याचदा 'ईडी'ची कारवाई ही अधिकाऱ्यांची मनमानी असते हेही स्पष्ट होते. एखाद्याविरोधात अटकेची कारवाई करताना अधिकारीगण स्वत:स 'सोयीस्कर, हवा तितकाच तपशील' निवडू शकत नाहीत, इतक्या स्पष्टपणे न्यायाधीश 'ईडी'स बजावतात. ते येथेच थांबत नाही ''एखाद्याची चौकशी करण्याची गरज आहे

याचा अर्थ त्या व्यक्तीस अटक करण्याची आवश्यकता आहे असा असू शकत नाही'' असे स्पष्ट करताना न्यायाधीश 'ईडी'स तुम्ही भ्रष्टाचाराच्या सर्व आरोपींस समान नियम लावता का असे विचारतात आणि त्यासाठी तपशीलही देतात. गेल्या वर्षात, म्हणजे २०२३ साली 'ईडी'ने ५९०६ जणांविरोधात गुन्हे दाखल केले. तथापि त्यापैकी फक्त ५३१ जणांचे घर आदींची झडती घेतली गेली आणि ५१३ जणांना प्रत्यक्ष अटक झाली. या संदर्भातील साद्यांत तपशील न्या. खन्ना यांनी सादर केला आणि 'ईडी' सर्वांना समान न्यायाने वागवते का असाही प्रश्न उपस्थित केला. त्याचे उत्तर नकारार्थी आहे हे सूचित होते. कारवाईमागील सापेक्षता आणि वस्तुनिष्ठता या संदर्भात न्यायालयाने उपस्थित केलेले मुद्दे यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित करणारे आहेत. यातील काही मुद्दे

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
गुरूवार २५ जुलै २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## नॅशनल हायस्कूल मांदिवली येथे शिक्षण सप्ताह उदघाटन सोहळा.

केळशी प्रतिनिधी.

दि यंग पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित नॅशनल हायस्कूल मांदिवली, येथे शिक्षण सप्ताह ( २२/७/२०२४ ते २८/७/२०२४) उदघाटन सोहळा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रम अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक फैयाज सर हे होते. इसरार मुकादम याने कुराण पठण, मनाल मुकादम हिने हमद, इरम वस्ता हिने नात सादर केले. प्रास्ताविक जमादार सर यांनी केले. शिक्षण सप्ताह फलकाचे अनावरण करून शिक्षण सप्ताहाची भुमिका, महत्व व दर दिवशीच्या उपक्रम बाबत मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक फैयाज सर यांनी केले.




कार्यक्रम सूत्रसंचालन जमादार सर यांनी केले.

शिक्षण सप्ताहाच्या पहिल्या दिवशी ‘‘अध्ययन व अध्यापन साहित्य दिवस ‘‘ या उपक्रम बाबतीत जमादार सर व फहीमा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून विविध शैक्षणिक तक्ते, मॉडेल तयार करून घेतले.

## न्यू इंग्लिश स्कूल,म्हसळा शाळेत गुरुपौर्णिमा साजरी

द. रा. जि. प्रतिनिधी: संतोष उध्दरकर.

म्हसळा: दि. २३ जुलै रोजी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज,म्हसळा विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली यावेळी अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून गुरु व शिष्य यांच्या नात्याचं महत्त्व पटवून दिले तसेच शिक्षक मनोगतात पाटील सर यांनी शिष्यांनी गुरूचा आदर कसे केले पाहिजे याचे उदाहरणे दिले व सौ.शिर्के मॅडम यांनी गुरुची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काय केले पाहिजे हे पटून दिले आणि मुंढे सर यांनी गुरुचे स्थान कसे आहे हे सांगितले तसेच विद्यार्थी मनोगतमध्ये कादंबरी जाधव, सलोनी जयस्वाल,अथर्व गायकवाड,अनंत गायकवाड,यश रणदिवे,वीर चव्हाण,निरुपा शिगवण शुभम जंगम,श्ृती मोरे या सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि निर्मिती कराडे या विद्यार्थिनीने गुरु पौर्णिमा निमित्त चारोळ्या सादर करून गुरुचे महत्व सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी मृण्मयी सुतार व कु.कृष्णा अडसूळ यांनी केले, सर्व कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थ्यांनी करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले या निमित्ताने सौ हाके ए.पी, क्रीडा शिक्षक मोरे सर, ज्येष्ठ लेखनिक भायदे सर, वसावे सर, कांबडी सर आदि शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## राजीव गांधी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी

मंडणगड तालुका विकास मंडळ मुंबई संचलित राजीव गांधी इंग्लिश मीडियम स्कूल मंडणगड या प्रशालेमध्ये



मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री शेडगे सर व श्री महाजन सर यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. मुख्याध्यापक श्री. महाजन सर यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच इयत्ता सहावी ची विद्यार्थिनी रिया भुवड हिने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विषयी माहिती दिली.ङ्गया कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ.मोरे मॅडम यांनी केले.

# परळी ग्रामपंचायत हद्दीतील धरणाचीवाडी आदिवासीवाडीची पूर्वापार ५० वर्षांपूर्वीच्या स्मशानभूमीचे अस्तित्व धोक्यात

विकासकाविरोधात आदिवासी बांधवांनी थोपटले दंड

शेकडो आदिवासी बांधव घेणार रायगड जिल्हाधिकारी यांची भेट

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत )सुधागड तालुक्यातील विविध भागात भांडवलदार, विकासक यांनी जागा जमिनी खरेदी करून नवनव्याने प्रकल्प, उद्योग, फार्महाऊस, थाटण्यास सुरवात केली आहे, मात्र यामध्ये अनेकदा स्थानिक, आदिवासी भूमिपुत्र यांच्या हक्क आणी अधिकारांवर गदा येताना पहायला मिळते. असाच प्रकार परळी ग्रामपंचायत हद्दीतील धरणाचीवाडी आदिवासी वाडी येथे समोर आला आहे. येथे एका विकासकाने स्मशानभूमी शेजारी बोअरवेल मारली असून सभोवताली कामे देखिल सुरु केली आहेत. त्यामुळे आदिवासी बांधवात नाराजीचा सुर असून धरणाचीवाडी गावची स्मशानभूमी वाचविण्यासाठी आदिवासी बांधवानी आता लढा पुकारला आहे. पूर्वापार ५० वर्षांपासून असलेल्या स्मशानभूमीचे अस्तित्व धोक्यात आल्याचा आरोप करीत आदिवासी बांधवानी विकासकाविरोधात दंड थोपटले आहेत. शासनाने आमची स्मशानभूमी जैसे थे ठेवून



त्याठिकाणी जाण्यायेण्याचे मार्ग सुकर करावेत अशी मागणी आदिवासी बांधवानी केली आहे. धरणाचीवाडी येथील आदिवासी बांधव लहान थोर आबाल वृद्धासह लवकरच या प्रश्नावर शेकडो च्या संख्येने जिल्हाधिकारी रायगड यांची भेट घेऊन न्याय मागणार असल्याचे सांगितले.

ङ्गङ्ग यावेळी ग्रामस्थ मारुती जाधव यांनी सांगितले की स्मशानभूमी चे अस्तित्व धोक्यात आले आहे, विकासकाने इथं असलेला जोता पाडला आहे. स्मशान भूमीची दुरावस्था झाली आहे. आम्हाला न्याय मिळाला नाही तर संपूर्ण गाव उपोषणाला बसेल असा इशारा जाधव यांनी दिला. स्मशानभूमी वाचविण्यासाठी आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे देखील लवकरच मोर्चा नेणार असल्याचा इशारा यावेळी आदिवासी बांधवांनी दिला. ङ्गङ्ग तसेच ग्रुप ग्रामपंचायत परळी भ्रष्टाचार निर्मूलन आघाडी च्या उपसरपंच अलका देशमुख व विद्यमान ग्रामपंचायत सदस्या सौ. शारदा ज्ञानेश्वर गायकवाड यांनी सांगितले की धरणाची आदिवासी वाडी येथील स्मशानभूमीचा प्रश्न आता ऐरणी वर आला आहे. स्मशानभूमीकडे जाण्याचा रस्ता अत्यंत खडतर झाला आहे. पावसाळ्यात एखाद्या व्यक्तीवर अंत्यविधी करायची वेळ आली तर शेड अभावी मृत देहाची विटंबना होते, अशी परिस्तिती आहे. ५० वर्षांपासून असलेली पूर्वापार स्मशानभूमी विकासासाठी यापूर्वी शासनाचा निधी देखील वापरण्यात आला आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांच्या स्मशानभूमी चा हक्क कायम अबाधित राहावा यासाठी आम्ही येत्या काळात आदिवासी बांधवांच्या लढ्यात सहभागी होऊन आंदोलनात्मक भुमिका घेणार आहोत. असे सौ.देशमुख व सौ.गायकवाड यांनी सांगितले.ङ्गङ्गधरणाची आदिवासी वाडी येथील महिला ग्रामस्थ सुरेखा जाधव यांनी सांगितले की आमची पिढ्यानं पिढ्याची स्मशानभूमी आहे. विकासकाने येथे बोअरवेल लावली आहे, स्मशानभूमी कडे जाणाऱ्या रस्त्याची अतिशय बिकट अवस्था आहे, शासनाने याकडे लक्ष देऊन आम्हाला न्याय द्यावा अन्यथा आम्ही या प्रश्नावर आमरण उपोषणास बसणार आहोत. असा इशारा दिला.

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना इच्छुकांनी अर्ज करावेत

रत्नागिरी, (जिमाका):

सामाजिक न्याय विभागाकडून अनु.जाती व नवबौध्द घटकांना १०० टक्के अनुदानावर (मोफत) शेतजमीन उपलब्ध करून




देण्याकरिता दि. १४ ऑगस्ट २०१८ च्या शासननिर्णयानुसार कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यात येते. तरी इच्छुक पात्र अर्जदाराने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पहिला मजला, कुवारबांव, रत्नागिरी यांच्याकडे अटींची पूर्तता करणारे पुरावे / कागदपत्रासह संपर्क साधून अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त संतोष चिकणे यांनी केले आहे.

लाभाचे स्वरुप :- ङ्गया योजनेअंतर्गत अनु.जाती व नवबौध्द घटकाच्या दारिद्र्य रेषेखालील भूमीहीन कुटुंबाला जमीन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ४ एकर कोरडवाहू (जिरायती) जमीन किंमत कमाल रु.५ लाख प्रती एकर किंवा २ एकर ओलीताखालील (बागायती जमीन किंमत कमाल रु.८ लाख प्रती एकर लाभार्थी निवडीचे निकष :- लाभार्थी अनु.जाती व नवबौध्द घटकातील असावा. लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील भूमीहीन असावा. लाभार्थीचे किमान वय १८ ते ६० वर्षे असावे. निवडीचे प्राधान्यक्रम :-दारिद्र्य रेषेखालील भूमीहीन परित्यक्त्या स्त्रिया. दारिद्र्य रेषेखालील भूमीहीन विधवा स्त्रिया. अनु.जाती / जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयांतर्गत अनु.जातीचे अत्याचारग्रस्त.

# कवी बसवंत थरकार यांच्या ‘‘नवी पहाट’’कविता संग्रहास उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कारने सन्मानीत.

राजयुवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व राजयुवा प्रकाशन पुणे या संस्थेतर्फे कवी बसवंत थरकार यांच्या ‘‘नवी पहाट‘‘ या पहिल्याच कविता संग्रहास उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार २०२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राजयुवा प्रतिष्ठान व राजयुवा प्रकाशन संस्थेतर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मालधक्का चौक पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात जेष्ठ साहित्यिक शरदच्चंद्र काकडे-देशमुख यांच्या हस्ते कवी बसवंत थरकार यांना गौरविण्यात आले. आयोजकांना परीक्षणासाठी एकूण सत्तर कवितासंग्रह प्राप्त झाले होते. त्यातून चार कवितासंग्रहांची उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती, त्या मध्ये ‘‘नवी पहाट‘‘ या कविता संग्रहाचा समावेश होता. पुरस्कार वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध गीतकार संजय वेदपाठक तर उद्घाटक म्हणून प्रा. डॉ शैलेंद्र भणगे, जेष्ठ साहित्यिका ललिता श्रीपाल




सबनीस, निर्माता व सिने अभिनेता रविंद्र बाराथे, वन विभाग लेखापाल,लक्ष्मण शिंदे, जेष्ठ साहित्यिक शरदच्चंद्र काकडे-देशमुख आदी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील सुमारे पंधरा साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण मित्र वगैरेंचा आकर्षक सन्मानचिन्ह, पदक, सन्मानपत्र व शाल देऊन गौरविण्यात आले. साहित्य, कला, सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात देत असलेले योगदान अनमोल असून विशेषतः साहित्य क्षेत्रातील गुणवत्तेबद्दल आदर आणि गुणांची कदर करुन साहित्यिकांच्या साहित्य कृतीस पुरस्कार प्रदान करत असल्याचे तसेच या मुळे संयोजकांना विशेष आनंद होत आहे. हा पुरस्कार म्हणजे समाजाच्या हितासाठी निःस्वार्थ पुणे करत असलेल्या प्रतिभाशाली साहित्यिक कार्याचा सन्मान आहे तसेच साहित्यिक कार्याचा व साहित्य कृतीचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान केला जात असल्याचे या वेळी सांगण्यात आले. व्यासपीठावरील मान्यवर साहित्यिकांनी आयोजक गौरव पुंडे, योगेश हरणे यांच्याया उपक्रमाचे तोंड भरुन कौतुक करुन या पुढे देखील त्यांच्या कार्यक्रमासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात सुमारे पन्नास निमंत्रित कवींसाठी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कवी बसवंत थरकार यांनी सादर केलेल्या ‘‘माझं मला‘‘ या कवितेला काव्य रसिकांची उत्कृष्ट दाद मिळाली. त्या बद्दल त्यांना आकर्षक स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिध्देश उतेकर व सौ रोहिणी डाके तसेच गौरव पुंडे यांनी तर कवी योगेश हरणे यांनी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप केला.

पुणे विभागीय कार्यालय पत्ता : बालाजी नगर कळ्ळ्ळ बँक शेजारी कुडाळकर क्लास पहिला मजला पुणे जिल्हा कार्यालय दैनिक सूर्योदय - अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती), संपर्क : ९६२३२३०४२६

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )